# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/03/2023 (गुरूवार) दुपार

---

## दुखापत

**१) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा शिवाना फॉर्म हाउस सोनेगाव शिवार येथे दिनांक २८/२/२०२३ चे २३.३० वा. ते २३.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सोनिया सुखदेव हनवते, वय २६ वर्ष, रा. प्लॉट नं ४२२ खुशी नगर जरीपटका ही आपल्या सर्व मित्र व मैत्रिणी सोबत शिवाना फॉर्म हाउस येथे वाढदिवस साजरा करण्याकरीता गेली असता पार्टी करून घराकडे परत जात असता यातील महिला आरोपी नामे— परी उर्फ प्रनिता देविदास भगत, वय ३२ वर्ष, रा. ईपेरीयल हाईट कडबी चौक, नागपुर हिने गाडीत बसण्याचे कारणावरुन फिर्यादी हिला अश्लिल भाषेत शिवीगाळ करून हातबुक्यांनी मारपीट करून फिर्यादीच्या उजव्या हाताचे अंगठया जवळ व डाव्या पायाचे मांडीजवळ दाताने चावा घेतला व उजव्या कानाचे जवळ नखाने ओरखडुन जखमी केले व मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, २९४, ५०६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार भोजराज तांदुळकर ब. नं ५०६ मो. नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत २७ कि.मी. अंतरावरील मौजा सालेभट्टी येथे दिनांक ०१/०३/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राहुल अरुनराव मेडुले, वय ३२ वर्ष, रा. सालेभट्टी (दंदे) ता. भिवापुर जि. नागपुर हा घरासमोरील रोडवर शेतातून आणलेला कडबा ट्रॅक्टर मधुन खाली उतरवत असता नमुद आरोपी नामे— अनिल मारोती शेरकी, वय ५३ वर्षे, रा. सालेभट्टी (दंदे) ता. भिवापुर जि. नागपुर याने तेथे येवून फिर्यादीस म्हणाला की ‘‘तु आमच्या भावाच्या मध्ये येवुन भाग का घेतो’’ असे म्हणुन याच कारणावरुन त्याने फिर्यादी सोबत झगडा भांडण करून शिवीगाळ केली व आरोपी याने त्याचे हातात असलेली वेळवाची काठीने फिर्यादीच्या डाव्या भागाचे कानाचे वर डोक्याला मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १३५५ ठाकूर मो. नं. ९८६०६६११६४ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. काटोल** :– दिनांक ०१/३/२०२३ चे ९.३० वा. ते १०.०० वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता वय १८ वर्ष ०५ महिने ही घरी एकटीच हजर असताना यातील आरोपी नामे– १) विधीसंघर्ष बालक याने घरात घुसून ''मी तूझ्यावर प्रेम करतो आपण लग्न करू. माझा सोबत चल'' असे म्हटले असता मूलीने नकार दिला असता आरोपीने शिवीगाळ करून हातबुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीचे केस पकडुन घराचे बाहेर ओढत आणले व फिर्यादीशी ओढताण करून कपडे फाडून फिर्यादीस लज्जा निर्माण होईल अशाप्रकारे फिर्यादीचा विनयभंग केला तसेच आरोपी क्र. २) किरण टेकाम ३) सिमा तुमडाम तिन्ही रा. मेंढकी यांनी सुध्दा फिर्यादीस मारहाण करून शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ४५२, ५०४, ५०६, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पंचफुला मोरे मो. नं. ९०४९६०७११५ या करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा विकासनगर कोंढाळी येथे दि. २८/०२/२०२३ चे २१.०० वा. ते दि. ०१/०३/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नामदेवरावजी वामनराव चरडे, वय ७४ वर्ष, रा. विकासनगर कोंढाळी ता. काटोल जि. नागपुर व फिर्यादीची पत्नी हे नेहमीप्रमाणे त्यांच्या रूम मध्ये झोपले व फिर्यादीच्या ३ मुली दुसऱ्या रूममध्ये रात्री अंदाजे ०९.०० वा. दरम्यान झोपले व दि. ०१.३.२०२३ रोजी सकाळी उठले असता फिर्यादीने रूममध्ये ठेवलेल्या कापडी पिशवी मधिल रोजमजुरीचे १५०००/– रू. दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचे बंद दाराची साखळी बाहेरून उघडुन घरात प्रवेश करून रूममध्ये पिशवीत ठेवलेले १५०००/–रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक सुनिल ठोंबरे ब. नं. २०३३ पोस्टे कोंढाळी मो. नं. ७४९८६५७९६३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**